# नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १७४/२०२० मधील
# निशाण २९२ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.१इ हे दि.१८/०४/२०२० रोजी, प्रतिवादी क्र.१९ हे दि.३१/०८/२०२० रोजी व प्रतिवादी क्र.२० हे दि.१५/०९/२०२० रोजी मयत झाले असून त्यांना अर्जात नमूद केलेले वारस हेच सरळ व कायदेशीर वारस आहेत. वादी यांनी निशाण २७७, निशाण २७८ व निशाण २७९ वर दाखल केलेल्या मृत्यूदाखल्यांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र.१इ हे दि.१८/०४/२०२० रोजी, प्रतिवादी क्र.१९ हे दि.३१/०८/२०२० रोजी व प्रतिवादी क्र.२० हे दि.१५/०९/२०२० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादी यांनी दावा मिळकतींचे सरस–निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी हा दावा दाखल केला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१इ, प्रतिवादी क्र.१९ व प्रतिवादी क्र.२० यांचे वारसांविरुध्द दाव्याचे कारण पुढे चालू राहते. सबब, या कामी प्रतिवादी क्र.१इ, प्रतिवादी क्र.१९ व प्रतिवादी क्र.२० यांचे अर्जात नमूद केलेले वारस अभिलेखावर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

१. वादी यांचा निशाण २९२ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.१इ, प्रतिवादी क्र.१९ व प्रतिवादी क्र.२० यांचे अर्जात नमूद केलेले वारस अभिलेखावर घेणेसाठी वादी यांना परवानगी देणेत येत आहे.

३. वादी यांनी आज पासून १४ दिवसांचे आत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी व अभिलेखावर दाव्याची दुरुस्त प्रत दाखल करावी.

-

Digitally signed by Dhiraj Maruti Hinglajkar
Date: 2021.03.23 17:51:46 +0530

**दिनांक २०/०३/२०२१** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः विटा.** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,विटा,**

**ता. खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCS. No.174 of 2020
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Stenographer:V.A.Mane
Court Name: 3rd Joint Civil & Criminal Court, Vita, Dist.Sangli.
Date of decision : 20.03.2021
Order signed by P.O.on : 22.03.2021
Order uploaded on : 22.03.2021